# लघुशोध प्रकल्प

# राग प्रस्तुतीकरणात भावदर्शक स्वरोच्चार

## सारांश

''रंजयती इति राग:'' म्हणजे मनोरंजन करतो तो राग अशी रागाची व्याख्या प्राचीन ग्रंथकारां पासून तर आजच्या धर्मव्रत, श्रीरंग संगोराम हया चिंतनशील संगीत लेखकासह सर्वांना मान्य आहे. रागाची आकर्षित रचना ही मनाला आकर्षित करते. पण अद्यापही शास्त्रीय संगीताचा म्हणजेच राग गायनाची व्याप्ती संपूर्ण आकारताच येईल असे नाही एखादा कलाकार रागगायन सादर करतो म्हणजे काय तर त्या रागाची रचनात्मक संकल्पना व त्यासाठी रागातील स्वरांचे उच्चार हेच मूळ प्रथम कलाकारास साधावे लागते साधनेनंतर राग साधला की तो स्वत:ला व मग इतरांना आकर्षित करतो. रागगायन व त्याचे श्रवण हा एक उत्तम गायनाचा संस्कार आहे.

शास्त्रीय संगीतातून मनोरंजन कसे होते? तेच ते स्वर आळविले जातात तरीही दोन रागांची नावे वेगळी कशी? या विषयीच्या जिज्ञासेपायी सामान्य लोक संगीत विद्यालयात प्रवेश घेतात. परिक्षा पद्धतीप्रमाणे राग शिकतांना निबद्ध आलाप, ताना व स्वरलिपीप्रमाणे केवळ स्वर उच्चारण करीत छोटे ख्याल व बडे ख्याल शिकतात हया शिक्षण पद्धतीत कुठल्याच रागाच्या मूळ गाभाऱ्यात त्यांना शिरता येत नाही व त्याविषयीचे योग्य मार्गदर्शन मिळत नाही.

राग म्हणजे स्वरांचा आकर्षित करणारा प्रभावी स्वरसमूह भारतीय संगीतातील ''राग'' हया शब्दाची अनेक ग्रंथकारांनी विविधतेने व्याख्या केली आहे व त्याचे विवरण ही केले आहे. संगीताच्या प्रकारातील गायन व वादनशैलीतील विविधांगाचे मूळ बीज हे राग या कल्पनेवर साकारलेले दिसते. विविध स्वर रूपाने विकसित होणारा राग ही संगीतातील लवचिक पण निश्चित चौकट देणारे प्रमाण म्हणता येईल. प्रत्येक रागाचा स्वतंत्र भाव असतो बहुतांशी राग मानवाच्या कलात्मक बुध्दिमत्तेतून निर्माण झालेले आहेत. एकुण ७ शुध्द व ५ विकृत स्वर,

त्यांच्या विविध आकृती, त्यातील भावपूर्ण उच्चार हेच रागभावाला संबोधित करण्यारे समर्पक साधन म्हणता येईल

गायन असो किंवा वादन 'राग' कल्पनेचे बीज स्वरांच्या विविध उच्चाररूपाने साकारले जाते. त्याला रागाचा स्वरसमूह, रागातील स्वरसंगती, रागवाचक स्वरोच्चार अशा रूपांनी संबोधले जाते. व त्याचे पुढे विश्लेषण केले जाते. रागाचा मूळ घटक म्हणजे लययुक्त स्वर.

वर्णा अलंकार अभ्यासातून रागाचा अभ्यास रागवाचक उच्चारासाठी महत्वपूर्ण ठरतो. अलंकारांचा आधार घेत मंद्र मध्यवतार सप्तकातील स्वराभ्यास हा रागाचा अभ्यास करण्यास आधार भूत बनतो. रागगायनात अलंकारांचा प्रयोग रागनियम व प्रकृतीनुसार क्रमवार संतुलीत ठेवून रागाचे प्रस्तुतीकरण समृद्ध होते

वादीसंवादी हया रागाच्या प्राणतत्वातून त्या त्या रागाची उकल केली जाते. रागाच्या विस्ताररूपातील ते मध्यबिंदु मानले जातात. आलाप करीत असतांना वादी संवादी स्वराचा दिर्घ उच्चार म्हणजेच त्या स्वराचे महत्त्व व पर्यायाने या स्वरावरील मुक्काम. इतर स्वरामध्ये रचनेतील तो स्वर पुन्हा पुन्हा गायिल्या गेला की त्या स्वराभेवती सर्व रागाचा आकृति बंध फिरतो वादी संवादी स्वराच्या मुळाशी रागाचे समयचक्र आधारलेले आहे.

रागवाचक स्वरोच्चारासाठी रागाची लक्षणे स्वरसंगती महत्वाची आहेत. रागवाचक स्वरसंगती ही गमक हया गायनाच्या महत्वपूर्ण घटकावर आधारलेली आहे. रागप्रस्तुतीकरणात त्यातील काही ठराविक गमकक्रियांचा प्रयोग हा प्रमुख्याने असतो

गायन वादन क्रियेतील ही अतिशय नाजूक सांगितिक क्रिया आहे. ज्यामुळे राग प्रस्तुती भावपूर्ण होण्यास सहाय्य होते. काही रागात काही विशेष स्वरसंगती असतात. त्यांशिवाय रागाचे स्वरूप पूर्णपणे व्यक्त होत नाही. अशा स्वरसंगती त्या त्या रागांचे अंग असतात.

रागातील स्वरोच्चार हा रागगायनात आलापी द्वारे दर्शविल्या जातो.वर्ण अलंकाराचा अभ्यास किवा सराव केल्यानंतर रागसंगीताच्या अभ्यासात अलंकारांचा अभ्यास हा निश्चित स्वरुपाने फायदाचा ठरतो एकदा आरोही अवरोही रचनेचे रागातील मर्म समजले की आलाप ही प्रक्रिया साधली जाते.

आलापानंतर तान ही स्वरांना जलद म्हणण्याची क्रिया आकार, इकार, उकार युक्त स्वरांना जलद म्हणण्याचा सराव प्रथम करावा लागतो तान स्पष्ट येण्यासाठी अलंकाराचा अभ्यास केल्या जातो. अलंकारांची स्पष्टता गळयातून उमटू लागली की तान म्हणणे शक्य आहे.

रागाचे चलन, ठहराव, प्रमुख स्वरसंगती हयावर आधारित अलंकार योजून तान केल्यास ती रागवाचक तान होऊ शकते. रागात प्रयोग होणाऱ्या स्वरांचा आरोही अवरोही क्रम म्हणजे सरळ तान बनते.

रागातील स्वरोच्चार व स्वरभाव अभ्यासासाठी संपूर्ण स्वरलिपीपद्धतीवर अवलंबून राहता येत नाही. मौखिक गुरूमुखी गायन अभ्यासानंतर रागाच्या ज्या काही बंदिशी बडा ख्याल, छोटा ख्याल, तराना, त्रिवट राग शिकत असतांना शिकविल्या जातात त्यातच रागाचे स्वर संगतीवाचक प्रमुख उच्चार दडलेले असतात. रागाचे वादीसंवादी स्वर, स्वरसंगती रागाची प्रकृती आरोही. अवरोही वृत्ती बंदिशीच्या अभ्यासाने रागाचे आरोह–अवरोह राग चलन शोधता आले पाहिजे त्याचा व्यासंग अभ्यास, चिंतन यातून रागाची प्रस्तुती ही स्वरांच्या विविध प्रक्रिये द्वारे होऊ शकते.

**प्रस्तुत संशोधक**

**डॉ. सुजाता व्यास**

**सहयोगी प्राध्यापक संगीत विभाग,**

**वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था,**

**नागपूर**